क्र.का.१६/संशोधन व विकास/
प्र.क्र.०१/११/५०२-५५१
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक - १२/०४/२०११.

विषय :- मुद्रांक शुल्क वसूलीबाबत...
दुर्लक्षित क्षेत्रे.....

## परिपत्रक

असे निदर्शनास आले आहे की, सध्या विभागामार्फत होणाऱ्या मुद्रांक शुल्क वसूलीमध्ये, स्वयंप्रेरणेने येणाऱ्या स्थावर मालमत्तेचे दस्तऐवजांवरच भर दिला जातो. त्यामुळे, ज्या दस्तऐवजांचा स्थावर मालमत्ता अथवा दस्तऐवज नोंदणीशी संबंध नाही, ते कायमच दुर्लक्षित रहातात. परिणामत: अशा दस्तऐवजांचे माध्यमातून जाणीवपूर्वक अथवा अज्ञानाने दाट महसूल हानी होवू शकते. यासाठी, विभागातील सर्वांनी जे दस्तऐवज सहसा विभागासमोर कामकाजाचे निमित्ताने येत नाहीत, अशा स्वरुपाच्या दस्तऐवजांवर लक्ष केंद्रीत करण्याची आवश्यकता आहे.

या संदर्भात या कार्यालयाने नुकत्याच काही चाचणी तपासण्या घेतल्या आहेत. त्यामध्ये असे निदर्शनास आले आहे की, मोबाईल कंपन्या प्रत्येकवेळी नविन ग्राहकांची नोंदणी करताना एक अर्ज भरुन घेतात. या छापील अर्जाच्या मागे, संबंधित कंपनीच्या अटी व शर्ती असतात. अर्जामध्ये किंवा अर्जाचे खाली किंवा अटी-शर्तीचे खाली एक छोटेसे प्रतिज्ञापत्र वजा घोषणापत्र असते. त्यामध्ये अर्जदार हा अर्जातील सर्व मजकूर खरा व बरोबर असल्याचे व संबंधित कंपनीने घातलेल्या अटी व शर्ती मान्य असल्याचे घोषित करतो. या पध्दतीने ग्राहकाने केलेल्या अर्जाला जरी मुद्रांक शुल्क देय नसले तरी त्यातील अथवा त्यासोबतचे घोषणापत्रास मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ चे अनुसूची-१ चे अनुच्छेद ४ प्रमाणे मुद्रांक शुल्क देय होवू शकते. तत्सम प्रकारचे घोषणापत्र परकीय चलनाची अदलाबदल करणेसाठी दिलेल्या अर्जामध्येही पहावयास मिळते. विमा कंपन्या, बँका, विविध सेवा संस्था यांचेकडील कामकाजामध्ये अशा स्वरुपाचे दस्तऐवज असण्याची दाट शक्यता आहे.

दुसरे असे की, अर्जातील अटी-शर्ती खाली किंवा घोषणापत्रामध्ये जर अर्जदार व कंपनी अशा दोघांच्या सहया असतील, तर हा दोघांतील करार ठरु शकतो. अशावेळी अनुच्छेद ५ च्या तरतूदी येथे लागू होवू शकतात. असा दस्तऐवज अनुच्छेद ५ चे कोणत्या खंड अथवा उपखंडात मोडतो हे तपासून निर्णय घेणे आवश्यक आहे.

हे परिपत्रक मार्गदर्शक स्वरुपाचे असून, असे अनेक दस्तऐवज आहेत की, ज्यामध्ये देय असलेले मुद्रांक शुल्क दिले जात नाही. तरी, सर्वांनी आपल्या कार्यक्षेत्रामध्ये अशा प्रकारचे दस्तऐवजांचा कसोशीने शोध घेवून, सकारात्मक परिणाम पुढे येण्यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न करावेत.

का.प्र.मा.नोंमनि, यांचे सहीची असे.

सही/-XXX
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक
महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता

प्रति,

१) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांना.
२) सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक
३) सर्व सहजिल्हा निबंधक वर्ग-१ तथा मुद्रांक जिल्हाधिकारी
४) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.